नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

औरंगाबाद कृषी हवामान सल्ला **शुक्रवार, दिनांक –१२ मार्च २०२१**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १३ ते १७ मार्च, २०२१)				
दिनांक	१३/०३	१४/०३	१५/०३	१६/ ०३	१७/०३
पाऊस (मिमी)	०.०	०.०	०.०	०.०	०.०
कमाल तापमान (अं.से.)	३७	३७	३८	३९	३९
किमान तापमान (अं.से.)	२१	२१	२१	२३	२५
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	अंशतः ढगाळ	स्वच्छ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	२९	२६	१९	१६	२२
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	१२	१४	१२	१०	१०
वा-याचा वेग (किमी / तास)	८	५	९	१३	१४
वा-याची दिशा	ईशान्य	आग्नेय	दक्षिण	वायव्य	दक्षिण

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार जिल्हयात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ ते अंशतःढगाळ राहील.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
उन्हाळी भुईमूग	वाढीची अवस्था	पिकाच्या आवश्यकतेनुसार पिकात पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रस शोषण करणाऱ्या (फुलकिडे, मावा, तुडतुडे) किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के ०२ मिली किंवा थायमिथोकझाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ टक्के ०३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
रब्बी ज्वारी	काढणी अवस्था	वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या रब्बी ज्वारी पिकाची काढणी करून घ्यावी.
गहू	काढणी अवस्था	वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या गहू पिकाची काढणी करून घ्यावी.
केळी	घड बाहेर पडणे अवस्था	नवीन लागवड केलेल्या केळी बागेत खोडाजवळ आच्छादन करावे. केळी बागेत पाणी व्यवस्थापन करावे.
आंबा	फलधारणा ते फळ वाढीची अवस्था	आंबा बागेत खोडाजवळ आच्छादन करावे. आंबा बागेत पाणी व्यवस्थापन करावे. आंबा बागेत फळगळ दिसून येत असल्यास ५० पीपीएम जिर्बलिक असिड ची फवारणी करावी. आंबा बागेत खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या जुन्या वाळलेल्या फांद्या कापून टाकाव्यात. मुख्य खोड लगत भुसा दिसून आल्यास तारेच्या आकड्याने आतील अळ्या काढून नष्ट कराव्यात व छिदामध्ये पेट्रोलमध्ये बुडविलेला बोळा किंवा क्लोरोपायरीफॉस द्रावणाचा (२ मिली प्रती लिटर पाणी) बोळा टाकावा व छिद्र शेणाने अथवा मातीने लिपून घ्यावे.

द्राक्षे	काढणी अवस्था	काढणीस तयार असलेल्या द्राक्ष घडांची काढणी करून घ्यावी.
सिताफळ	-	नवीन लागवड केलेल्या सीताफळ बागेत खोडाजवळ आच्छादन करावे.
भाजीपाला	वाढीची/काढणी अवस्था	वेलवर्गीय भाजीपाला पिकात नाग अळी/पाने पोखरणारी अळी चा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी सायांट्रॅनिलिप्रोले १०.२६% १८ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे.काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करावी.
फुल शेती	वाढीची/काढणी अवस्था	फुल पिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे. काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून घ्यावी.
तुती रेशीम उद्योग	--	सेंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्था म्हैसूर यांच्या शिफारशीनुसार रेशीम किटकावरील उझी माशीचे नियंत्रण एकात्मिक पद्धतीने करणे गरजेचे आहे.उझीसाइड, स्टिकीटाय, निसोलायनेक्सचा जैविक उपाय व उझीट्राय या सर्व पर्यायांचा एकत्रित वापर केला तर ८४% पर्यंत उझी माशीचे नियंत्रण होते. सर्व खिडक्या दरवाज्यांना नायलॉन वायरमेश जाळी लावणे आवश्क असून दरवाजे अपोआप बंद होण्याची व्यवस्था करणे रॅकला चोहीबाजुने नायलॉन वायर मेशने अच्छादिन करणे त्याच बरोबर संगोपन गृह प्रवेश द्वारा बाहेर नायलॉन वायर मेशचा वापर करून १०’ x १०’ आकाराचे अँटीचेम्बर तयार करणे म्हणजे शेतातून तुतीपाला आणल्यानंतर सरळ संगोपन गृहात न आणता १ ते २ तास अँटीचेम्बर मध्ये ठेवावे. अँटीचेम्बर अंधार खोली सारखे करावे म्हणजे उझी माशी बाहेरच्या बाजूस उडून निघून जाईल.
सामुदायिक विज्ञान	-	गर्भावस्थेच्या सुरुवातीच्या दोन महिन्यात गर्भाचे प्रमुख अवयव जसे कि हृदय,मज्जातंतू नलिका,डोळे,नाक, कान, हात,पाय यांच्या प्राथमिक विकसनास सुरुवात होते.त्यामुळे अगदी सुरुवातीपासून गर्भवतीची सर्वतोपरी काळजी घेणे नितांत गरजेचे आहे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा जनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.